लोकमत

# तृतीयपंथीयांच्या ओळखपत्रांसाठी शिबिर

सांगली : सेवा पंधरवडा कालावधीत सांगली जिल्ह्यातील तृतीयपंथीयांना नोंदणी प्रमाणपत्र व ओळखपत्र देण्यासाठी दि. २१ ते ३० सप्टेंबर या कालावधीत समाज कल्याण विभागातर्फे विशेष शिबिराचे आयोजन केले आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त तृतीयपंथीय व्यक्तींनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त जयंत चाचरकर यांनी केले आहे.

तृतीयपंथीयांना नोंदणी प्रमाणपत्र व ओळखपत्र देण्यासाठी समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालय सांगली कार्यालय, जुना बुधगाव रोड, सांगली व मुस्कान संस्था कार्यालय, ममता लॉज जवळ, कल्याणकर बिल्डिंग, झुलेलाल चौक, सांगली येथे विशेष शिबिर होणार आहे.

Hello Sangli
Page No. 3 Sep 20, 2022
Powered by: erelego.com